**दिनांक १८.०१.२०१० रोजी संपन्न होणा-या जिल्हा उद्योग मित्र समिती सभेचे कार्यवृत्त**

जिल्हा उद्योग मित्र समितीची सभा मा. निवासी उपजिल्हाधिकारी, अकोला यांचे अध्यक्षतेखाली दि. १८.०१.२०१० रोजी दुपारी ४.३० वाजता संपन्न झाली. सर्वप्रथम व्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, अकोला यांनी मा. निवासी उपजिल्हाधिकारी, अकोला यांचे व उपस्थितांचे स्वागत करून मा.अध्यक्ष महोदयांचे परवानगी सभेस सुरूवात केली. व सर्वप्रथम अकोला जिल्हातील औद्योगिक विकासाबाबत सविस्तर माहिती सभागृहात सादर केली. सभेत खालील विषयावर चर्चा करण्यात आली.

**अ - मागील सभेचे इतिवृत्त कायम करणे.**

**ब - दिनांक २७-१०-०९ रोजी झालेल्या जिल्हा उद्योग मित्र समिती सभेचे सभेचे इतिवृत्त सर्व संबंधितांना पाठविण्यात आलेले आहे.**

**प्रलंबीत मुद्ये.**

**कार्यवाही - १. ट्रान्सपोर्ट नगर.**
**मऔविमं.**

हयाबाबत मा.जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली दिनांक १६-०१-२०१० रोजी संपन्न झालेल्या ट्रान्सपोर्टनगर बाबत सभे मध्ये ठरल्यानुसार कार्यवाही करावी.असे मा. अध्यक्षांनी सभेत सुचित केले.

**कार्यवाही -२. मऔविमं. क्षेत्रात होणा-या पाणी पुरवठयातील अनियमीतता व नियोजनाबाबत-**
**मऔविमं.**

अकोला औद्योगिक क्षेत्रात पाणी पुरवठा नियमीत होत नाही याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली सध्या १८०० घनमिटर ऐवजी १००० घनमिटर पणी पुरवठा होत आहे. तसेच जून पर्यंत हा पाणी पुरवठा अत्यल्पच होईल असेही सभेत सांगण्यांत आले होते. तसेच कायमस्वरूपी पाणी पुरवठयाबाबत रू. ४२ कोटींचा प्रस्ताव मऔविमं. यांनी मुख्यालयास पाठविला होता त्यावर मुख्यालयाकडून काही तृटी आल्या असून, १/२ दिवसात प्रस्ताव सुधारीत करून पुन्हा मंजुरीकरीता मुख्यालयास पाठविण्यांत येईल असे मऔविमं. अधिका-यांनी सभेत सांगीतले. यावर मा. अध्यक्षांनी सदर प्रस्ताव त्वरीत मुख्यालयाय सादर करून पाठपुरावा करण्यांच्या सुचना दिल्या.

**कार्यवाही -३. ग्रोथ सेंटर ते शिवनी -शिवापुर गुडस् शेड मधील अप्रोच रोडबाबत-**
**मऔविमं.**

ग्रोथ सेंटर ते शिवनी -शिवनी शेड मधील अप्रोच रोड बनविण्याबाबतचा प्रस्ताव तयार करून ४ महिन्यापुर्वी मऔविमं., नियोजन विभाग, मुंबई यांना सादर करण्यात आला असून, अद्याप पावेतो त्यास मंजुरी मिळालेली नाही. प्रस्तावामध्ये तृटी आल्या होत्या त्या तृटींची पूर्तता करण्यांत आली असून प्रस्ताव पुन्हा मंजुरीकरीता मख्यालयास सादर करण्यांत आला आहे. असे मऔविमं. अधिका-यांनी सभेत सांगीतले. हयाबाबत B & C व जिल्हा परिषद हयांच्या संबंधित अधिकारी यांना पुढील सभेस बोलावून चर्चा करण्याच्या मा. अध्यक्षांनी सुचना दिल्या.

**कार्यवाही -४. आकोट औद्योगिक संघटनेने एमआयडीसी आकोट येथील विविध समस्या-**
**मऔविमं.**

एमआयडीसी अंतर्गत रस्ते दुरूस्ती काम पूर्ण झाले असून, आकोट अकोला मुख्य रस्ता एमआयडीसीला जोडणारा असून त्याच्या दोन्ही बाजूला मुरूम टाकण्यात आले आहे. तसेच एमआयडीसी अंतर्गतचे 80 % पथदिवे सुरू आहे. तसेच पथदिव्यावे देखभाल व निगा राखण्याचे काम स्थानिक कत्रांटदाराद्वारेच करण्यांत येत आहे. तसेच एमआयडीसी अंतर्गत पाणी पुरवठा पाणी फिल्टर करूनच करण्यात येत आहे. तसेच एमआयडीसी अंतर्गत सुरक्षा व्यवस्था करणे बाबत ही बाब पोलीस विभागाशी संबंधित आहे. असे कार्यकारी अभियंता **MIDC** यांनी सभेत सांगीतले. परंतू सभेस हजर आकोट **MIDC** असो. अध्यक्ष हयांनी हयावर आक्षेप घेता रस्त्याचे काम पूर्ण न झाल्या बाबत सभेत सांगीतले. यावर मा. अध्यक्षांनी पावसाळयापूर्वी सर्व काम पूर्ण करण्यांच्या संबंधितास सुचना दिल्या असून, तसेच पुढील सभेस आकोट पोलीस स्टेशनचे P.I हयांना सुध्दा हजर राहण्याबात सुचित करण्याच्या सुचना मा. अध्यक्षांनी दिल्या.

**कार्यवाही -५. ग्रोथ सेंटर मध्ये 11 K.V. व एमआयडीसी मध्ये 33 K.V. व नेटवर्क करण्याबाबत.**
**म.रा.वि.वि.क. /मऔविमं.**

मऔविमं. अकोला हयांचें कडून जागेबाबत ऑफर लेटर प्राप्त झालेले असून कोटेशन सुध्दा प्राप्त झालेले आहे. असे मराविविकं. कडून सांगण्यात आले लवकरच कार्यवाही करण्यांत येईल. यावर मा. अध्यक्षांनी पुढील सभेपर्यंत काम काम पूर्ण करण्यांच्या संबंधितास सुचना दिल्या.

**कार्यवाही - ६. मऔविमं. क्षेत्रात वाढते चोरीचे प्रमाण- मे.लेबेन लेबॉरेटरीजच्या कर्मचा-यांवर**
**पोलीस विभाग. प्राणघातक हल्ला-**

अकोला औद्योगिक क्षेत्रात कायम स्वरूपी पोलीस चौकी नसल्याने, चोरीचे प्रमाण वाढले आहे. याबाबत सभेस हजर पोलीस अधिका-याकडून सांगण्यांत आले की, **LCB** मार्फत अन्वेषण सुरू असून, रात्री होणा-या चोरीच्याबाबतीत पोलीस गस्त वाढविण्यांत आली आहे. **विषय बंद.**

**कार्यवाही - ७. एमआयडीसी क्षेत्रात कामय स्वरूपी पोलीस चौकी स्थापन करणेबाबत-**
**पोलीस विभाग**

अकोला एमआयडीसी क्षेत्रात वाढते चोरीचे प्रमाण, मारहाण व प्राणघातक हल्ले होत असल्याने हया क्षेत्रात कायमस्वरूपी पोलीस चौकी स्थापन करण्याची औद्योगिक संघटनेने मागील मागणी केली होती. हयावर मा. अध्यक्षांनी मा. जिल्हा पोलीस अधिक्षक हयांचेशी चर्चा करून अहवाल सादर करण्यांच्या मऔविमं. हयांना सुचना दिल्या होत्या. हयाबाबत सद्या **SDPO** नसल्याने कार्यवाही होवू शकली नाही. पुढील सभेत **SDPO** हयांना बोलविण्याचे मा. अध्यक्षांनी सुचित केले.

**कार्यवाही -८. मलकापुर रोड ते रेल्वे अंडर बायपास MIDC-II मधील अप्रोच रोडबाबत- मऔविमं.**

मलकापुर रोड ते रेल्वे लाईन अंडर ग्राउंड रोड **MIDC-II** पर्यंत करण्यांबाबत विदर्भ चेंबर ऑफ कॉमर्स ॲन्ड इंडस्टी यांनी मागणी सादर केली असून, सदर रोड झाल्यास शहरातील नागरीकांना व **MIDC** मध्ये काम करण्या-या कामगारांना जवळचा अप्रोच रोड उपलब्ध होईल व जाण्यायेण्याचे अंतर व अपघाताचे प्रमाण सुध्दा कमी होतील ही त्या मागील भुमीका आहे अशी औद्योगिक संघटनेची सभेत मागणी केली. हयावर सभेत मऔविमं. अधिका-यांनी सागीतले की, **MIDC** ची हद्दी पर्यंतचा रोड **MIDC** तयार करीत आहे. परंतू जी जागा **MIDC** हद्दीच्या बाहेर आहे. तेथे **MIDC** ला रोड तयार करता येणार नाही. असे सभेत सांगीतले. यावर **MIDC** यांनी जिल्हा परीषद व बांधकाम विभाग, हयांना पुढील सभेत उपस्थित राहण्याबाबतच्या सुचना मा. अध्यक्षांनी दिल्या.

**कार्यवाही -९. ग्रोथ सेंटर ते शिवनीगांव रोड रंदीकरण व अतिक्रमण हटविण्याबाबत- मऔविमं.**

ग्रोथ सेंटर ते शिवनीगांव रोड दुरूस्त व रूंदीकरण करण्याबाबत तसेच रोडच्या आजूबाजूस असलेली अतिक्रमणे हटविण्याबाबत **VVC&I** हयांनी मागणी केली असून ग्रामीण भागाचे अतिक्रमण हटविण्याचे काम जिल्हा परिषद व नॅशनल हाय-वे ऑथटी हयांचे कार्यक्षेत्रात येत असल्याने त्यांना कळविण्यांचे सर्वानुमते ठरले.

**कार्यवाही -१०. MIDC क्षेत्रातील पथदिवे बंद असल्याबाबत- मऔविमं.**

**मऔविमं.** एमआयडीसी क्षेत्रातील पथदिवे बंद आहेत. तसेच काही भागातील पथदिवे एक सुरू तर एक बंद अशा प्रकारे सुरू असून, त्यामुळे औद्योगिक क्षेत्रात चोरी, डकैती व गुंडार्दीचे प्रमाणात वाढ झालेली आहे. असे औद्योगिक संघटनेने कळविले यावर १० दिवसात पथदिव्याचे काम पूर्ण करण्यांत येईल असे मऔविमं. अधिका-यांनी सभेत सांगीतले. यावर सदर काम लवकरावत लवकर करण्याचे मा. अध्यक्षांनी निर्देश दिले.

**कार्यवाही -११. नॅशनल टीन सप्लायर प्लॉट नं. F-44 MIDC-II दुर्गंद करीत असल्याबाबत- मऔविमं/MPCB**

एमआयडीसी-२ येथील में. नॅशनल टीन सप्लायर प्लॉट नं. F-४४ MIDC-II हा प्लॉट भाडयाने दिलेला असून तेथे जुने तेलाचे डबे दुरूस्त करण्याचे काम होत आहे. तेथे भटट्ी लावून जुने तेलाचे टिनाचे डबे जाळण्यात येत असल्याने आजू-बाजूच्या संपूर्ण परीसरात दुर्गंध होत असून त्यामुळे आजू-बाजूच्या उद्योजकांना व कामगारांना काम करणे कठीण झाले आहे असे. भाटी उद्योग प्लॉट नं. F-४३ MIDC-II हयांनी कळविले असून, हयाबाबत MIDC व प्रदुषण विभाग हयांना कार्यवाही करण्याचे मा. अध्यक्षांनी निदेश दिले होते. हयावर **MPCB** हयांनी दि. ०७/११।०९ रोजी संबंधित भेट दिली व प्रदूषण होत असलेल्या सांड पाण्याचा नमुना रासायनिनक पृथकरणासाठी गोळा करण्यांत आला तसेच सदर घटकाकडे प्रदुषण विभागाची परवानगी नसल्याचेही आढळून आले. करीता संबंधित घटकास १५ दिवसाचे आंत तृटीची पूर्तता करण्याचे आदेश देण्यांत आलेले आहे. यावर प्लॉट धारक श्री. सोमानी यांना सभेस बोलावण्याचे मा. अध्यक्षांनी निर्देश दिले.

**कार्यवाही -१२. व्यवसायीन दृष्टया प्रवासी हवाई सेवा विकास-**
**मऔविमं.**

अकोला येथील शिवनी येथे **Airport** तयार करण्यांत आले असून, जवळपास त्याचे पूर्णत्वाचे काम पूर्ण होत आलेले आहे. परंतू त्यावरील धावपट्टी ही १.४ मीटर असून त्यावरून प्रवासी सेवा होवू शकत नाही करीता सदर धावपट्टी वाढवून ती १.४ मीटर वरून २.२ करण्यांत यावी. जेणे करून अकोला येथील व्यापारी व प्रवासी नागरीकांना साईचे होईल. अशी मागणी विदर्भ चेंबर ऑफ कॉमर्स अॅन्ड इंडस्ट्री या औद्योगिक संघटनेने केली. यावर **Airport** व PDKV च्या अधिका-यांना पुढील सभेस बोलवावे असे मा. अध्यक्षांनी निर्देश दिले.

**कार्यवाही -१३. VAT कायदया बाबत-**
**विक्रीकर विभाग.**

अकोला औद्योगिक क्षेत्रामध्ये उद्योजकांना **VAT Tax Refund** करीता दिनांक ३१ मार्च २००९ रोजी रिटर्न भरून चलानद्वारे जमा करतात त्यांना मागील वर्षाचा परतावा मिळण्यापुर्वी नवीन वर्षाचा **VAT Tax** भरावा लागतो. तरी ही विसंगती दूर करण्यासाठी कार्यवाही करण्यांबाबत औद्योगिक संघटनेने कळविले असून, ऑडीट केल्यानंतर रिफंड देण्यांत येईल. असे विक्रीकर विभाग अधिका-यांनी मागील सभेत सांगीतले होते. यावर विक्रीकर विभाग अधिकारी यांना पुढील सभेस बोलवावे असे मा. अध्यक्षांनी निर्देश दिले.

**मा. अध्यक्षांच्या परवानगीने वेळेवर येणारे विषय :**

**कार्यवाही -१. प्लॉट क्र. पी-३, MIDC ताबा मिळण्याबाबत -**
**मऔविमं.**

हयाबाबत विदर्भ चेंबर ऑफ कॉमर्स & इंडस्ट्री यांनी MIDC येथील प्लॉट क्र. पी-३, चा ताबा देण्यांबाबत सभेत सांगीतले. यावर मा. अध्यक्षांनी MIDC अधिका-यांशी केली व प्लॉट वाटप बाबत झालेली अनियमीतता नियमीत करून पुढील सभेपुर्वी संबंधितास प्लॉटचा ताबा देण्याच्या सुचना प्रादेशिक अधिकारी, MIDC अमरावती हयांना दिल्या.

**-स्वाक्षरीत-**

| | |
|---|---|
| मा.जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,<br>जिल्हा उद्योग मित्र समिती सभा. | महाव्यस्थापक तथा सदस्य सचिव<br>जिल्हा उद्योग मित्र समिती सभा. |

क्र.जिउके/अ/झुम-सभा-कार्यवृत्त/१०
जिल्हा उद्योग केंद्र, अकोला
दिनांक:-

प्रति,
मा.जिल्हाधिकारी,
अकोला.

विषय : जिल्हा उद्योग मित्र समिती सभेचे कार्यवृत्त NIC चे संकेत स्थळावर उपलब्ध करून देणेबाबत.

महोदय,

वरील विषयानुसार सविनय कळविण्यांत येते की, जिल्हा उद्योग मित्र समिती सभेचे दिनांक १८/०१/२०१० व ०३/०४/२०१० चे कार्यवृत्त आपल्या मान्यतेनुसार NIC चे संकेत स्थळावर उपलब्ध करून देण्याकरीता विनंती करण्यांत येत आहे.

आपला विश्वासू,

महाव्यवस्थापक,
जिल्हा उद्योग केंद्र, अकोला.

प्रतिलिपी : NIC Office, अकोला यांना विनंती की, सदर कार्यवृत्त NIC चे संकेत स्थळावर उपलब्ध करून द्यावी ही विनंती.